# ज्ञानसागर कोचिंग क्लासेस, अहमदनगर

## घटक चाचणी परीक्षा

## प्रकरण - १ (विश्व : द्रव्याचे)

इयत्ता- ९ वी (मराठी माध्यम)

विषय - विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग - १

वेळ - १ तास

गुण - २०

**प्र. 1 अ) रिकाम्या जागा भरा.** 2

1) साधारणपणे, पदार्थाच्या ———, ——— व ——— या तीन अवस्था असतात.
2) ——— आणि ——— हे संप्लवनशील पदार्थ आहेत.
3) उष्णता दिल्यावर, स्थायूरुप पदार्थाचे रुपांतर ——— मध्ये व ——— चे रूपांतर वायूत होते.
4) पाण्याचा गोठनबिंदू ——— आहे.

**ब) योग्य जोड्या जुळवा.** 2

| | | अ | ब |
|---|---|---|---|
| 1) | वायू | माती | दूध |
| 2) | स्थायू | रॉकेल | ऑक्सिजन |
| 3) | द्रव | कार्बन मोनाक्साइड | वाटाणा |

**क) खालील विधाने सत्य कि असत्य ते लिहा व असत्य विधाने दुरूस्त करून लिहा.** 2

1) सुर्यचुलीमध्ये जी भांडी वापरली जातात त्यांच्या बाहेरील बाजूला काळा रंग असतो.
2) क्रिकेटच्या कसोटी सामन्यात खेळाडू रंगीत कपडे घालतात.
3) आपण उन्हाळ्यात लोकरीचे कपडे वापरतो.
4) स्थायूंना निश्चित आकार व आकारमान असते.

**ड) गटात न बसणारा शब्द ओळखा.** 2

1) हवा, रॉकेल, पाणी, दुध
2) खोडरबर, पुस्तक, बर्फ, डिझेल
3) कपाट, कार्बनडायऑक्साईड, पिशवी, बाटली
4) खडू, पितळ, पाण्याची वाफ, माती

**प्र. 2 अ) खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (कोणतेही दोन)** 4

1) कोणत्याही पदार्थाचे अवस्थांतर होताना तापमान स्थिर का राहते?
2) बर्फ पाण्यावर का तरंगतो?
3) कोरड्या व गरम दिवशी वाळवंटातील शीतयंत्र अधिक थंड हवा देते. का?
4) गरम चहा बशीत का ओततात.?

**ब) कारणे लिहा. (कोणतेही दोन)** 4

1) LPG च्या सिलिंडरमध्ये वायू द्रवरुपात भरलेला असतो.
2) बंद डब्याच्या आतील बाजूंवर वायू दाब देतो.
3) उन्हाळ्यात माठात ठेवलेले पाणी गार होते.
4) पहाटे आपल्याला झाडांच्या पानावर दवबिंदू दिसतात.

**प्र. 3 अ) उत्तरे लिहा. (कोणताही एक)** 2

1) गरम अन्नपदार्थाचा वास कित्येक मीटरपर्यंत पोहोचतो, पण थंड अन्नाचा वास घेण्यासाठी जवळ का जावे लागते?
2) हिवाळ्यामध्ये रंगीत कपडे घालणे का पसंत करतात.

**ब) खालील प्रत्येक बदलाला एक शास्त्रीय शब्द लिहा. (कोणतेही दोन)** 2

1) स्थायूरुप मेणाचे रुपांतर द्रवरुप मेणात होणे.
2) बर्फाचे पाणी होणे.
3) विस्तवाजवळ ठेवलेल्या प्लास्टीकच्या भांड्याचा आकार बदलणे.
4) गोठलेली लोणी फ्रिजच्या बाहेर ठेवणे.

*****

DNYANSAGAR
A'Nagar